# राज्याचा हवामान, पिक पेरणी व पिक परिस्थितीचा दिनांक २६/०८/२०२४ अखेरचा खरीप हंगाम २०२४-२५ चा साप्ताहिक अहवाल.

- **हवामान** : राज्यात अहवाल कालावधीत बहुतांश विभागात आकाश ढगाळ होते. कोंकण व नाशिक विभागात काही ठिकाणी जोरदार ते अतिजोरदार तर तुरळक ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली. पुणे विभागात काही ठिकाणी हलक्या ते मध्यम तर तुरळक ठिकाणी जोरदार ते अतिजोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली. कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, लातूर, अमरावती व नागपूर विभागात काही ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

- **खरीप हंगाम-२०२४-२५ :**

- **पिक परिस्थिती :**

राज्यात खरीप पिकांचे सरासरी क्षेत्र (ऊस वगळून) १४२.०२ लाख हेक्टर असून दि.२६ ऑगस्ट, २०२४ अखेर १४४.५६ लाख हेक्टर क्षेत्रावर (१०२%) पेरणी झाली आहे. तसेच राज्यात खरीप पिकांचे ऊस पिकासह सरासरी क्षेत्र १५२.९७ लाख हेक्टर असून १४६.४९ लाख हेक्टर क्षेत्रावर (९६%) पेरणी/लागवड झाली आहे. मागील वर्षी दि.२१.०८.२०२३ रोजी संपणाऱ्या सप्ताहाअखेर राज्यातील ऊस पिकासह पेरणी क्षेत्र १४२.५५ लाख हे. (सरासरीशी ९३%) तर ऊस पिक वगळून पेरणी क्षेत्र १३९.८४ लाख हे. (सरासरीशी ९८%) होते.

- पुर्नलावगड झालेले भात व नाचणी पिके रोपे, वाढीच्या ते फुटवे फुटणेच्या अवस्थेत आहेत.
- ज्वारी पिक वाढीच्या ते पोटरीच्या अवस्थेत आहे.
- बाजरी पिक वाढीच्या, फुटवे फुटणे ते कणसे लागणेच्या अवस्थेत आहे.
- मका पिक तुरे लागणे ते कणसे लागणेच्या अवस्थेत आहे.
- मूग, उडीद पिके शाखीय वाढ, फुलोरा, शेंगा लागणे ते शेंगा भरणेच्या अवस्थेत आहे.
- सोयाबीन पिक फुलोरा ते शेंगा लागणेच्या अवस्थेत आहे.
- कापूस पिक फुलपाते ते बोंडे लागणेच्या अवस्थेत आहे.
- तूर पिक शाखीय वाढीच्या अवस्थेत आहे.
- भुईमूग पिक फुलोरा, आऱ्या सुटणे ते शेंगा लागणेच्या अवस्थेत आहे.
- नवीन आडसाली ऊसाची लागण अंतिम टप्प्यात असून हंगामी, मागील वर्षाच्या सुरु व खोडवा ऊसामध्ये आंतरमशागतीची कामे सुरु आहेत.

**पर्जन्यमान (२०२४)**

दि.१ जून ते २६ ऑगस्ट, २०२४ या कालावधीमधील राज्यातील सरासरी पाऊस ७७८.४ मि.मी. असून दि.२६ ऑगस्ट, २०२४ पर्यंत ९३२.१ मि.मी. म्हणजेच सरासरीच्या ११९.७ टक्के पाऊस झाला. मागील वर्षी दि.२६.०८.२०२३ अखेर ६६६.७ मि.मी. म्हणजेच सरासरीच्या ८५.६ टक्के पाऊस झाला.

राज्यात दि.१ जून ते दि.२६ ऑगस्ट, २०२४ अखेरीस सरासरीच्या तूलनेत प्रत्यक्ष पडलेल्या पावसानुसार (प्रागतिक) जिल्ह्याची वर्गवारी खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | पर्जन्यमान टक्केवारी | जिल्हे संख्या | जिल्ह्यांची नावे |
|---|---|---|---|
| १ | ० ते २५ % | ० | ---- |
| २ | २५ ते ५० % | ० | ---- |
| ३ | ५० ते ७५ % | ० | ---- |
| ४ | ७५ ते १०० % | ७ | रायगड, नाशिक, कोल्हापूर, नांदेड, परभणी, हिंगोली, अमरावती. |
| ५ | १०० % पेक्षा जास्त | २७ | ठाणे, पालघर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, नंदुरबार, जळगांव, धुळे, पुणे, अहमदनगर, सोलापूर, सातारा, सांगली, छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, लातूर, धाराशिव, बुलढाणा, अकोला, वाशिम, यवतमाळ, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली. |

राज्यात दि.२६ ऑगस्ट, २०२४ अखेर पर्जन्यमान सरासरीच्या तूलनेत एकूण ३५५ तालूक्यांपैकी ० तालूक्यात ० ते २५%, ० तालुक्यात २५ ते ५०%, ५ तालुक्यात ५० ते ७५%, ६१ तालूक्यात ७५ ते १००% तर २८९ तालूक्यात १०० % पेक्षा जास्त पाऊस झाला आहे.

❖ **नैसर्गिक आपत्ती** :

दि.२३ ऑगस्ट, २०२४ च्या प्राथमिक नजरअंदाज अहवालानुसार माहे, ऑगस्ट-२०२४ मधील पावसामुळे शेती व फळपिकांचे नुकसान झाले आहे. यामध्ये ६०९७.९७ हे. क्षेत्र बाधित झाले आहे. तर बुलढाणा जिल्हयात हुमणी किडीमुळे सोयाबीन पिकाचे ८८९.०० हे. क्षेत्र बाधीत झाले आहे.


❖ **किड व रोग :**

राज्यात काही ठिकाणी सोयाबीन पिकावर तंबाखुवरील पाने खाणारी अळी, उंट अळी, खोडमाशीचा, चक्रीभुंगा, कापूस पिकावर गुलाबी बोंड अळी, मावा तुडतुडे, भात पिकावर पिवळया पाने गुंडाळणारी अळी, निळे भुंगेरे, खोडकिडीचा, पिवळा मोझॅक, मूग, उडीद पिकावर पाने खाणाऱ्या अळीचा, मका व ज्वारी पिकावर लष्करी अळीचा अल्प प्रमाणात प्रादुर्भाव आढळून येत आहे.


किडरोग व्यवस्थापनासाठी क्षेत्रिय स्तरावर शेतीशाळा, कृषि विद्यापीठांकडील पिक संरक्षण सल्ले, सर्वेक्षणासाठी फेरोमेन सापळे व ल्युर्सचा पुरवठा तसेच जैविक किटकनाशकांच्या वापराबाबत सूचना इत्यादी उपाययोजना करण्यात येत आहेत. तसेच त्याबाबत जनजागृती करण्यात येत आहे.

## खरीप हंगाम सन-२०२४-२५ मधील राज्यस्तरीय पेरणी क्षेत्र (लाख हे.) व टक्केवारी

(दि.२६ ऑगस्ट, २०२४ अखेर)



## खरीप हंगाम सन-२०२४-२५ मधील पिकनिहाय पेरणी क्षेत्राचा सरासरी पेरणी क्षेत्राशी तुलनात्मक तक्ता (दि.२६ ऑगस्ट, २०२४ अखेर)




## विभाग निहाय पिक परिस्थिती

### कोकण विभाग खरीप हंगाम

❖ **हवामान** : अहवाल कालावधीत बहुतांश ठिकाणी आकाश ढगाळ होते. विभागात काही ठिकाणी जोरदार ते अतिजोरदार तर तुरळक ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली आहे.

❖ **पिक पेरणी** : विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र ४.१४ लाख हेक्टर असून, दि.२६ ऑगस्ट, २०२४ अखेर ३.५० लाख हेक्टर क्षेत्रावर (८५%) पेरणी झाली आहे.

❖ **पिक परिस्थिती** :

➢ पुर्नलागवड झालेले भात व नाचणी पिके वाढीच्या ते फुटवे फुटणेच्या अवस्थेत आहेत.
➢ तूर पिक शाखीय वाढीच्या अवस्थेत आहे.
➢ मूग, उडीद, तीळ, कारळे पिके वाढीच्या,फुलोरा ते शेंगा लागणेच्या अवस्थेत आहेत.
➢ विभागात अतिवृष्टीमुळे भात पिकाचे नुकसान झाले आहे.

❖ **किड व रोग** :

विभागात काही ठिकाणी भात पिकावर पिवळी खोडकिड, पाने गुंडाळणारी अळी, निळे भुंगेरे, सुरळीतली अळीचा अल्प प्रमाणात प्रादुर्भाव आढळून येत आहे.

### नाशिक विभाग खरीप हंगाम

❖ **हवामान** : अहवाल कालावधीत बहुतांश ठिकाणी आकाश ढगाळ होते. विभागात काही ठिकाणी जोरदार ते अतिजोरदार तर तुरळक ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली आहे.

❖ **पिक पेरणी** : विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र २०.६५ लाख हेक्टर असून, दि.२६ ऑगस्ट, २०२४ अखेर २०.४२ लाख हेक्टर क्षेत्रावर (९९%) पेरणी झाली आहे.

❖ **पिक परिस्थिती** :

➢ पुर्नलागवड झालेले भात व नागली पिके वाढीच्या ते फुटवे फुटणेच्या अवस्थेत आहेत.
➢ बाजरी पिके वाढीच्या, फुटवे फुटणे ते कणसे लागणेच्या अवस्थेत आहे.
➢ मका पिक वाढीच्या, तुरे लागणे ते कणसे लागणेच्या अवस्थेत आहे.

- मूग, उडीद, सोयाबीन पिके वाढीच्या, फुलोरा ते शेंगा लागणेच्या अवस्थेत आहे.
- भुईमूग पिक फांदया फुटणे ते आऱ्या सुटणेच्या अवस्थेत आहे.
- कापूस पिक फुलपाते लागणेच्या अवस्थेत तर काही ठिकाणी बोंडे लागणेच्या अवस्थेत आहे.
- आडसाली ऊसाची लागण अंतिम टप्प्यात असून हंगामी, मागील वर्षीच्या सुरु व खोडवा ऊस वाढीच्या अवस्थेत असून ऊसामध्ये आंतरमशागतीची कामे सुरु आहेत.

❖ **किड व रोग :**

विभागात काही ठिकाणी मका पिकावर लष्करी अळीचा अल्प प्रमाणात प्रादुर्भाव आढळून येत आहे.

## पुणे विभाग खरीप हंगाम

❖ **हवामान** : अहवाल कालावधीत बहुतांश ठिकाणी आकाश ढगाळ होते. विभागात काही ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या तर तुरळक ठिकाणी जोरदार ते अतिजोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली आहे.

❖ **पिक पेरणी :** विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र १०.६५ लाख हेक्टर असून, दि.२६ ऑगस्ट, २०२४ अखेर १४.४३ लाख हेक्टर क्षेत्रावर (१३५%) पेरणी झाली आहे.

❖ **पिक परिस्थिती :**

- पुर्नलागवड झालेले भात व नाचणी पिके फुटवे फुटणे ते वाढीच्या अवस्थेत आहेत.
- बाजरी पिक पोटरी, कणसे लागणे ते कणसांमध्ये दाणे भरणेच्या अवस्थेत आहे.
- मका पिक तुरे लागणे ते कणसे लागणेच्या अवस्थेत आहे.
- तीळ व सुर्यफुल पिके फुलोरा अवस्थेत आहेत.
- भुईमूग पिक फांदया फुटणे ते आऱ्या सुटणेच्या अवस्थेत आहे.
- तूर पिक शाखीय वाढीच्या अवस्थेत आहे.
- मूग, उडीद पिके फुलोरा, शेंगा लागणे ते शेंगा पक्वतेच्या अवस्थेत आहेत.
- सोयाबीन पिक फुलोरा ते शेंगा लागणेच्या अवस्थेत आहे.
- कापूस पिक वाढीच्या ते फुलपाते लागणेच्या अवस्थेत आहे.
- खरीप हंगामातील पिकांच्या पेरण्या पुर्ण झालेल्या असून पिकांमध्ये आंतरमशागतीची कामे सुरु आहेत.

❖ **किड व रोग :**

विभागात काही ठिकाणी सोयाबीन पिकावर उंट अळी, चक्रीभुंगा, कापूस पिकावर गुलाबी बोंड अळी, मूग, उडीद पिकावर पाने खाणाऱ्या अळीचा, मका पिकावर लष्करी अळीचा अल्प प्रमाणात प्रादुर्भाव आढळून येत आहे.

## कोल्हापूर विभाग खरीप हंगाम

❖ **हवामान** : अहवाल कालावधीत बहुतांश ठिकाणी आकाश ढगाळ होते. विभागात काही ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली आहे.

❖ **पिक पेरणी :** विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र ७.२८ लाख हेक्टर असून, दि.२६ ऑगस्ट, २०२४ अखेर ७.३२ लाख हेक्टर क्षेत्रावर (१०१%) पेरणी झाली आहे.

❖ **पिक परिस्थिती :**

- पुर्नलागवड झालेले भात व नाचणी पिके वाढीच्या, फुटवे फुटणे ते पोटरीच्या अवस्थेत असून, पिकांमध्ये आंतरमशागतीची कामे सुरु आहेत.

- ज्वारी पिक वाढीच्या ते पोटरीच्या अवस्थेत आहे.
- बाजरी पिक पोटरी, फुलोरा ते कणसे लागणेच्या अवस्थेत आहे.
- भुईमूग, सोयाबीन पिके शाखीय वाढ ते फुलोरा अवस्थेत आहे.
- मूग, उडीद पिके फुलोरा, शेंगा लागणे ते शेंगामध्ये दाणे भरणेच्या अवस्थेत आहेत.
- मका पिक वाढीच्या ते तुरे बाहेर पडण्याच्या अवस्थेत आहे.
- तूर पिक शाखीय वाढीच्या अवस्थेत आहे.
- नवीन आडसाली ऊसाची लागण सुरु आहे. गाळपास जाणारा ऊस वाढीच्या अवस्थेत आहे.

❖ **किड व रोग :**

विभागात काही ठिकाणी भात पिकावर खोडकिडीचा, सोयाबीन पिकावर पाने खाणारी अळी, उंट अळी, पांढरीमाशी, रस शोषणाऱ्या किडींचा, भुईमूग पिकावर हुमणीचा, तूर, मूग, उडीद पिकांवर उंट अळी व पाने खाणाऱ्या अळीचा, मका व ज्वारी पिकावर लष्करी अळीचा अल्प प्रमाणात प्रादुर्भाव आढळून येत आहे.

## छ.संभाजीनगर विभाग खरीप हंगाम

❖ **हवामान** : अहवाल कालावधीत बहुतांश ठिकाणी आकाश ढगाळ होते. विभागात काही ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली आहे.

❖ **पिक पेरणी :** विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र २०.९० लाख हेक्टर असून, दि.२६ ऑगस्ट, २०२४ अखेर २०.९८ लाख हेक्टर क्षेत्रावर (१००%) पेरणी झाली आहे.

❖ **पिक परिस्थिती :**

- ज्वारी व बाजरी पिके वाढीच्या, पोटरीच्या ते कणसे लागणेच्या अवस्थेत आहेत.
- भुईमूग पिक शाखीय वाढीच्या ते फुलोरा लागणेच्या अवस्थेत आहे.
- सोयाबीन पिक वाढीच्या, फुलोरा ते शेंगा लागणेच्या अवस्थेत आहे.
- मूग, उडीद पिके फुलोरा, शेंगा लागणे, शेंगामध्ये दाणे भरणे ते पक्वतेच्या अवस्थेत आहे.
- मका पिक वाढीच्या ते तुरे लागणेच्या अवस्थेत आहे.
- तूर पिक शाखीय वाढीच्या अवस्थेत आहे.

❖ **किड व रोग :**

विभागात काही ठिकाणी सोयाबीन पिकावर उंट अळी, पाने गुंडाळणारी अळीचा, मका पिकावर लष्करी अळीचा अल्प प्रमाणात प्रादुर्भाव आढळून येत आहे.

## लातूर विभाग खरीप हंगाम

❖ **हवामान** : अहवाल कालावधीत बहुतांश ठिकाणी आकाश ढगाळ होते. विभागात काही ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली आहे.

❖ **पिक पेरणी :** विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र २७.६७ लाख हेक्टर असून, दि.२६ ऑगस्ट, २०२४ अखेर २८.१८ लाख हेक्टर क्षेत्रावर (१०२%) पेरणी झाली आहे.

❖ **पिक परिस्थिती :**

- मूग, उडीद पिके शेंगा लागणे, शेंगा भरणे, शेंगा पक्वतेच्या ते तोडणीच्या अवस्थेत आहे.
- तूर पिक शाखीय वाढीच्या अवस्थेत आहे.

- ज्वारी पिक वाढीच्या ते पोटरीच्या अवस्थेत आहे.
- बाजरी पिक फुटवे फुटणे ते कणसे लागणेच्या अवस्थेत आहे.
- सोयाबीन पिक फांदया फुटणे, फुलोरा, शेंगा लागणे ते शेंगा भरणेच्या अवस्थेत आहे.
- कापूस पिक शाखीय वाढ ते फुलपाते लागणेच्या अवस्थेत आहे.

**किड व रोग :**

विभागात काही ठिकाणी सोयाबीन पिकावर चक्रीभुंगा, पांढरीमाशी, तंबाखुवरील पाने खाणाऱ्या अळीचा, पिवळा मोझॅक, उंट अळी, मका पिकावर लष्करी अळीचा, कापूस पिकावर रस शोषणाऱ्या किडींचा अल्प प्रमाणात प्रादुर्भाव आढळून येत आहे.

## अमरावती विभाग खरीप हंगाम

**हवामान** : अहवाल कालावधीत बहुतांश ठिकाणी आकाश ढगाळ होते. विभागात काही ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली आहे.

**पिक पेरणी :** विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र ३१.५९ लाख हेक्टर असून, दि.२६ ऑगस्ट, २०२४ अखेर ३०.८६ लाख हेक्टर क्षेत्रावर (९८%) पेरणी झाली आहे.

**पिक परिस्थिती :**

- मूग, उडीद पिके शेंगा भरणे, पक्वतेच्या ते काढणीच्या अवस्थेत आहेत.
- ज्वारी व मका पिके वाढीच्या ते पोटरीच्या अवस्थेत आहे.
- तूर पिक शाखीय वाढीच्या अवस्थेत आहे.
- कापूस पिक शाखीय वाढ, फुलपाते ते बोंडे लागणेच्या अवस्थेत आहे.
- सोयाबीन पिक फुलोरा ते शेंगा लागणेच्या अवस्थेत आहे.
- विभागात बुलढाणा जिल्हयात हुमणी अळीमुळे सोयाबीन पिकाचे नुकसान झाले आहे.
- विभागात अतिवृष्टीमुळे शेत पिकांचे नुकसान झाले आहे.

**किड व रोग :**

विभागात काही ठिकाणी सोयाबीन पिकावर चक्रीभुंगा, खोडमाशी, तंबाखुवरील पाने खाणाऱ्या अळी, येलो मोझॅक, उंट अळी या किडींचा, तूर पिकावर मर रोगाचा, उंट अळीचा, मूग, उडीद पिकावर रस शोषणाऱ्या किडींचा, कापूस पिकावर गुलाबी बोंड अळी, रस शोषणाऱ्या किडींचा अल्प प्रमाणात प्रादुर्भाव आढळून येत आहे.

## नागपूर विभाग खरीप हंगाम

**हवामान** : अहवाल कालावधीत बहुतांश ठिकाणी आकाश ढगाळ होते. विभागात काही ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली आहे.

**पिक पेरणी :** विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र १९.१५ लाख हेक्टर असून, दि.२६ ऑगस्ट, २०२४ अखेर १८.८७ लाख हेक्टर क्षेत्रावर (९९%) पेरणी झाली आहे.

**पिक परिस्थिती :**

- पुर्नलागवड झालेले भात पिक वाढीच्या ते फुटवे फुटणेच्या अवस्थेत आहे.
- सोयाबीन पिक शाखीय वाढ ते फुलोरा अवस्थेत आहे.

- ज्वारी पिक वाढीच्या ते पोटरीच्या अवस्थेत आहे.
- कापूस पिक फुलपाते लागणेच्या अवस्थेत आहे.
- तूर पिक शाखीय वाढीच्या अवस्थेत आहे.
- पेरणी झालेल्या पिकांमध्ये आंतरमशागतीची कामे सुरु आहेत.

❖ **किड व रोग :**

विभागात काही ठिकाणी भात पिकावर पिवळी खोडकिड, कापूस पिकावर गुलाबी बोंड अळी, मावा तुडतुडे, सोयाबीन पिकावर उंट अळीचा अल्प प्रमाणात प्रादुर्भाव आढळून येत आहे.

❖ **प्रधानमंत्री पिक विमा योजना (खरीप-२०२४)** (दि.०१.०८.२०२४ अखेर) **:**

- **शेतकरी सहभाग संख्या : १६७.८० लाख**
- **विमा संरक्षित क्षेत्र : ११२.१५ लाख हे.**

**महाराष्ट्र राज्यातील खरीप हंगाम २०२४-२५ मधील मुख्य पिकाखालील दि.२६.०८.२०२४ अखेरचा पिक पेरणी अहवाल**

(क्षेत्र हेक्टरमध्ये)

| अ.क्र. | पिके | पाच वर्षाचे सरासरी क्षेत्र (२०१६-१७ ते २०२०-२१) | मागील वर्षाची दि.२८.०८.२०२३ रोजीची पेरणी | सन २०२४-२५ मधील दि.२६.०८.२०२४ अखेर प्रत्यक्ष पेरणी | पेरलेल्या क्षेत्राची पाच वर्षाच्या सरासरी क्षेत्राशी टक्केवारी (२०१६-१७ ते २०२०-२१) | प्रत्यक्ष पेरलेल्या क्षेत्राची मागिल वर्षाच्या क्षेत्राशी टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | स्तंभ ५ ची स्तंभ ३ च्या तुलनेत % | स्तंभ ५ ची स्तंभ ४ च्या तुलनेत % |
| १ | भात | १५०८३७४ | १४९५५८३ | १४५६२६४ | ९७ | ९७ |
| २ | खरीप ज्वारी | २८८६१५ | ११०८७७ | १०५०१२ | ३६ | ९५ |
| ३ | बाजरी | ६६९०८९ | ३६१९५१ | ४०३१३७ | ६० | १११ |
| ४ | रागी | ७८१४९ | ७३६११ | ६७०२५ | ८६ | ९१ |
| ५ | मका | ८८५६०८ | ९००१९१ | ११२१४७४ | १२७ | १२५ |
| ६ | इतर तृणधान्य (राजगिरा, कोडू/कोद्रा, कुटकी, वरई, बार्टी, सावा, राळा, इतर) | ४०४४५ | ४१७९६ | ३२७१२ | ८१ | ७८ |
| **एकूण तृणधान्य** | | **३४७०२७९** | **२९८४००८** | **३१८५६२४** | **९२** | **१०७** |
| ७ | तूर | १२९५५१६ | १११५५७७ | १२१४७७९ | ९४ | १०९ |
| ८ | मुग | ३९३९५७ | १७५९६० | २३४८६७ | ६० | १३३ |
| ९ | उडीद | ३७०२५२ | २५३००३ | ३८६११८ | १०४ | १५३ |
| १० | इतर कडधान्य (कुळीथ, चवळी, मटकी, राजमा, इतर) | ७८८४५ | ६०५७३ | ७२०६१ | ९१ | ११९ |
| **एकूण कडधान्य** | | **२१३८५७१** | **१६०५११३** | **१९०७८२६** | **८९** | **११९** |
| **एकूण अन्नधान्य** | | **५६०८८५०** | **४५८९१२१** | **५०९३४५०** | **९१** | **१११** |
| ११ | भुईमुग | १९१५७५ | १४१९१६ | १४७५६९ | ७७ | १०४ |
| १२ | तीळ | १५१६२ | ४५२६ | ७६५२ | ५० | १६९ |
| १३ | कारळ | १२४६० | ६४१९ | ३७९८ | ३० | ५९ |
| १४ | सुर्यफुल | १३७८० | २७४१ | ९७६२ | ७१ | ३५६ |
| १५ | सोयाबीन | ४१४९९१२ | ५०२८२१८ | ५११७५१८ | १२३ | १०२ |
| १६ | इ.गळीतधान्य(एरंडी,इतर) | ९४५२ | ३५०२ | २२१४ | २३ | ६३ |
| **एकूण तेलबिया** | | **४३९२३४०** | **५१८७३२३** | **५२८८५१३** | **१२०** | **१०२** |
| **१७** | **कापूस** | **४२०११२८** | **४२०७९७६** | **४०७३६६१** | **९७** | **९७** |
| **एकूण पेरणी क्षेत्र (ऊस वगळून)** | | **१४२०२३१८** | **१३९८४४२०** | **१४४५५६२४** | **१०२** | **१०३** |
| **१८** | **उस (लागवडीचा)** | **१०९५०७५** | **२७०३३७** | **१९३५७२** | **१८** | **७२** |
| **एकूण पेरणी क्षेत्र (ऊसासह)** | | **१५२९७३९४** | **१४२५४७५७** | **१४६४९१९६** | **९६** | **१०३** |

टिप - पेरणी क्षेत्र नजर अंदाजित.